# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर
## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेलः adrkolhapur@rediffmail.com


**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २०.११.२०२०**

## जिल्हा : कोल्हापूर

| मागील आठवड्यातील हवामान (१४.११.२०२० ते २०.११.२०२०) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (२१.११.२०२० ते २५.११.२०२०) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | दिनांक | २१ | २२ | २३ | २४ | २५ |
| ० | ० | ० | ० | ० | ० | ० | पाऊस (मिमी) | ४ | ० | ० | ० | ० |
| ३१.० | ३१.३ | ३१.८ | ३२.० | ३२.४ | ३१.० | ३३.१ | कमाल तापमान (अं.से.) | ३२ | ३३ | ३३ | ३१ | ३२ |
| १५.७ | १६.५ | १७.८ | १८.५ | २०.९ | १९.६ | १९.० | किमान तापमान (अं.से.) | २१ | २२ | २१ | २० | १९ |
| ० | ० | ० | ६ | ६ | २ | ० | ढग स्थिती (आकाश) | ७ | ५ | ५ | ३ | ४ |
| ८६ | ७९ | ८२ | ९० | ९७ | ९३ | ९५ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ८० | ६९ | ७४ | ६८ | ५७ |
| ४३ | ४० | ४७ | ४७ | ४७ | ६१ | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ४६ | ४० | ४० | ४४ | ३६ |
| १.९ | १.० | १.९ | १.७ | १.९ | २.२ | २.६ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ४ | ५ | ४ | ७ | ९ |
| पु. | ई | ई | ई | पु. | उ. | पु. | वाऱ्याची दिशा | पु.आ. | पु.आ | पु.आ. | पु.आ. | पु.आ. |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| **हवामान सारांश/ इशारा** | | प्रादेशिक हवामान संशोधन केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार कोल्हापूर जिल्ह्यामध्ये दिनांक २१ नोव्हेंबर रोजी तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. कमाल तापमान ३१.० ते ३३.० अंश सेल्सिअस दरम्यान तर किमान तापमान १९.० ते २२.० अंश सेल्सिअस दरम्यान राहील. वाऱ्याचा वेग ताशी ०४ ते ०९ कि.मी. पर्यंत वाढण्याची शक्यता आहे. |
| **सामान्य सल्ला** | | ➢ रबी पिकांमध्ये गरजेनुसार खुरपणी / कोळपणी करून घ्यावी.<br>➢ कीटकनाशक व बुरशीनाशकाची फवारणी करताना स्टीकर चा वापर करावा.<br>➢ शेतकरी बांधवांनी हवामान आधारित शेतीविषयक सल्ला आपल्या अँड्रॉइड मोबईलवर मिळविण्यासाठी गुगल प्ले स्टोअर वरून " मेघदूत" अँड्रॉइड ॲप्लिकेशन तर मेघगर्जना व विजांचा कडकडाट इ.च्या अंदाजासाठी "दामिनी" अँड्रॉइड ॲप्लिकेशन डाउनलोड करावे व त्याचा वापर करावा. |
| **संदेश** | | ➢ उशिरा पक्व होणाऱ्या भात व नाचणी पिकांची काढणी व मळणी करून घ्यावी. हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याने तयार शेती मालाची कोरड्या व सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| **गहू** | अंकुरणे | ➢ गव्हाची पेरणी १५ नोव्हेंबर नंतर उशिरा केल्यास प्रत्येक पंधरावाड्यास हेक्टरी २.५ क्विंटल उत्पादन कमी येते त्यामुळे १५ डिसेंबर नंतर पेरणी करणे टाळावे. |
| **मका** | वाढीची | ➢ अमेरिकन लष्करी आळीचे नियंत्रण :<br>➢ रासायनिक नियंत्रण: १. आळीच्या वाढीच्या सुरवातीच्या (१ ते ३ अवस्था) अवस्थांमध्ये निंबोळी अर्क ५%यांची ५ मिली प्रती लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. किंवा २. थायमेथोक्झाम १२.६ %+ लँम्डा सायहेलोथ्रीन ९.५ % झेड सी. या मिश्र किटकनाशकाची ०.५ मिली प्रती लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. किंवा ३. क्लोरांट्रानिलीप्रोल १८.५ % एस.सी. या किटकनाशकाची ०.३ मिली प्रती लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी |
| **हरभरा** | अंकुरणे | ➢ पहिली कोळपणी पेरणीनंतर २० दिवसांनी करावी.<br>➢ पिक पाण्यास अतिशय संवेदनशील असल्याने गरजेपेक्षा जास्त पाणी दिले गेल्यास पिक उभळते.<br>➢ तुषार सिंचन पद्धतीचा वापर केल्यास उत्पादनामध्ये मोठी वाढ होते. तुषार सिंचनपद्धीतीमुळे पिकास दिलेली खते पिकास व्यवस्थित उपलब्ध होतात. |
| **काजू** | पालवी | ➢ काजूवरील ढेकण्या (टी मॉस्कीटो बग) : झाडांना नवीन पालवी आल्यापासून ते फळधारणा होईपर्यंत हि कीड उपद्रव करते. नियंत्रणासाठी लॅम्ब्डा सायहॅलोथ्रीन ५ % ६ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **मिरची** | वाढीची | ➢ फुलकिड्यांचा प्रादुर्भाव झाल्यास नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रीड १७.८% एस.एल.५मिलि किंवा फिप्रोनिल ५ एस.सी. १५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर
## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेलः adrkolhapur@rediffmail.com**

| | | |
|---|---|---|
| **वांगी** | वाढीची | ➢ रस शोषणाऱ्या तुडतुडे, मावा व पांढरी माशी या किडींचा प्रादुर्भाव झाल्यास नियंत्रणासाठी फॉस्पोमिडॉन ४०% एस.एस. १५ मिली किंवा फेनप्रोपॅथ्रीन ३०% ई.सी. या कीटकनाशकाच्या प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात मिसळून आवश्यकतेनुसार आलटून पालटून फवारण्या घ्याव्यात. |
| **ऊस** | पूर्वहंगामी : लागवड | ➢ पूर्व हंगामी ऊस लागवड जमिनीमध्ये वापसा आल्यावर करावी. लागवडीसाठी को.८६०३२(नीरा), को.एम.०२६५(फुले २६५), एम.एस.१०००१ (फुले १०००१),को.९४०१२(फुले सावित्री), को.सी.६७१(वसंत-१) या जातींची निवड करावी.<br>➢ बेणे प्रक्रिया: बुरशीजन्य रोग व खवले किड याच्यापासून प्रतिबंधासाठी ऊस बेणे लागणीपूर्वी १०० लिटर पाण्यात डायमेथोएट ३० % प्रवाही २६५ मिली मिसळून १० मिनिटांसाठी बुडवून ठेऊन बेणे प्रक्रिया करावी. |
| | आडसाली : तोडणी | ➢ उस तोडणी हंगामनिहाय व पक्वता पाहून करावी. तोडणीपुर्वी पिकाचे पाणी १५ दिवस बंद करावे व तोडलेला उस ताबडतोब गळीतास पाठवावा. पूर्वहंगामी ऊसाची १४ ते १५ महिन्यात आणि आडसाली ऊसाची १६ ते १८ महिन्यात तोडणी करावी.<br>➢ उसाचे पाचट व्यवस्थापन<br>➢ ऊस तोडणी झाल्यानंतर उसाचे पाचट कुजवीणेसाठी पाचटावर एकरी एक पोते युरिया व एक पोते सिंगल सुपर फॉस्फेट व त्यांनतर एकरी चार किलो पाचट कुजविणारे जीवाणू टाकावे. |
| **आंबा** | पालवी | ➢ बाष्पीभवनाने जमिनीतील सुमारे ७० टक्के ओलावा नष्ट होतो. यासाठी शेतातील काडी कचरा, धसकटे, गवत, तूरकाड्या, भुसा इत्यादीचे ७ ते ८ सेंटिमीटर जाडीचे आच्छादन करावे त्यामुळे बाष्पीभवनाचा वेग मंदावतो. |
| **जनावरे** | वाढीची | ➢ पशुधनासाठी मका, ओट, बरसीम, लसूनघास व ज्वारी या चारा पिकाची लागवड जमिनीत वापसा असल्यास करावी. |

स्त्रोत

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर

ठिकाण : २०.११.२०२० **स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा**
**सहयोगी संशोधन संचालक,**
**विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर**